## ३ वर्षे होमगार्ड सदस्यत्व प्रमाणपत्र ऑनलाईन प्राप्त करुन घेण्याची कार्यपध्दती

**भाग-१ . पात्रता**

i) होमगार्ड सदस्यत्व कालावधी ३ वर्षे किंवा ३ वर्षांपेक्षा जास्त झालेला असावा आणि नोंदणी दिनांक ०१/०१/२०१६ नंतर असावा..

ii) मागिल ३ वर्षातील कर्तव्य उपस्थिती ६०% किंवा ६० % पेक्षा जास्त असणे आवश्यक.

iii) प्राथमिक प्रशिक्षण पुर्ण असणे आवश्यक.

iv) किमान एक उजळणी /प्रगत/नेतृत्व प्रशिक्षण शिबीर पुर्ण करणे आवश्यक पंरतू कोविड कालावधी करिता सदर अट दि. ०१/०१/२०१६ नंतर नोंदणी केलेल्या उमेदवारांकरिता मर्यादित कालावधी करिता शिथील .

**भाग- २**

i) सदर प्रमाणपत्र होमगार्ड सदस्यांनी स्वत: ऑनलाईन प्राप्त करुन घ्यावयाचे आहे. याकरिता कोणत्याही स्वरुपाचा अर्ज करण्याची आवश्यक्ता असणार नाही. पुर्वी कार्यालयातून प्रमाणपत्र घेतलेल्या होमगार्डनी Online प्रमाणपत्र देय नाही. सदर प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी अपात्र ठरविले जाईल.

ii) जिल्हा होमगार्ड कार्यालय आणि पोलीस स्टेशन मधील कर्मचारी यांनी ऑनलाईन प्रणालीमध्ये केलेल्या नोंदींच्या आधारे सदर प्रमाणपत्र निर्गमित होत आहे. याकरिता कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करु नये तथा कोणत्याही अमिषाला बळी पडू नये.

iii) Online प्रमाणपत्र सुविधा दि. ०१.०३.२०२१ पासून सुरु होत असून या दिनांकानंतरच निर्गमित प्रमाणपत्र आरक्षण करिता ग्राहय राहतील. सदर प्रमाणपत्रावर कोणत्याही अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणार नाही. प्रमाणपत्रावर असलेल्या QR कोड च्या आधारे प्रमाणपत्र सत्यता पडताळणी करणेची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

iv) सदर प्रमाणपत्र पोलीस, वन, अग्निशमन या विभागामध्ये ५% आरक्षण कोटयातून अर्ज करणेकरिता ग्राहय असेल. मात्र अंतिम निवड उमेदवारानी सादर केलेले प्रमाणपत्र संबंधित जिल्हा होमगार्ड कार्यालयाकडून सत्यता पडताळणी अहवाल अनुकूल आल्यावरच निश्चित होईल.

v) प्रमाण पत्र प्राप्त झाल्यानंतर होमगार्ड सदस्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल झाला किंवा अथवा कर्तव्य बजाविण्यास विणाकारण हयगय , बेशिस्त वर्तन, केल्याचे सिध्द झाल्यास निर्गमित केलेले प्रमाणपत्र रदद करण्याचा अधिकार मा. महासमादेशक ,होमगार्ड महाराष्ट्र राज्य यांनी राखून ठेवलेला आहे.

vi) प्रमाणपत्राची बोगस प्रत तयार करणे, प्रमाणपत्राचा गैरवापर करणे असे प्रकार दखलपात्र गुन्हा असतील याची नोंद घ्यावी.

(v) दि ०१.०३.२०२१ नंतर निर्गमित झालेली Online प्रमाणपत्र आरक्षण कोटयातून अर्ज करणे करिता ग्राहय राहतील. दि. ०८.०२.२१ ते १०.०२.२०२१ या दरम्यान प्रणालीच्या चाचणी वेळी काढलेली प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही.

**भाग-३ प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची कार्यपध्दती :-**

*(*For better print -Required Configuration :- Win10,Updated browser – Internet explorer , Chrome )*

i) ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेकरिता होमगार्ड सदस्यांनी महाराष्ट्र होमगार्ड च्या maharashtracdhg.gov.in या संकेत स्थळावर जावून HOMEGUARD DATA MANGEMENT SYSTEM या क्लिक करावी.

ii) होमगार्ड मध्यवर्ती संगणक प्रणाली च्या Home page वर गेल्यावर Homeguard Corner या मेनू मध्ये Three Years Certificate या सबमेनूवर क्लिक करावी.

iii) या पेजवर पात्र होमगार्ड सदस्यांनी आपला सनद क्रमांक, जन्मदिनांक, आणि नोंदणी दिनांक दाखल करावी. अचुक माहितीची नोंद केल्यावर सदर होमगार्डचा कर्तव्य सरासरी तपशिल, प्रशिक्षण तपशिल दर्शविणारे page दिसेल. कर्तव्य सरासरी ६०% किंवा ६०% पेक्षा जास्त असेल तरच प्रमाणपत्र करिता पात्र (Eligible)असा शेरा दिसेल अन्यथा अपात्र (Not eligible) असा शेरा दर्शविला जाईल.

iv) पात्र होमगार्ड सदस्यांनी SUBMIT REQUEST या बटनावर क्लिक केल्यानंतर त्यांची Request मान्य केली जाईल आणि प्रमाणपत्र प्रिंट करुन घेण्याकरिता पुढील page दर्शविण्यांत येईल. अपात्र होमगार्डची Request अमान्य करणेत येईल. त्यांना प्रमाणपत्र देय होणार नाही.

(v) सदर तीन वर्षे सेवा प्रमाणपत्र जिल्हा होमगार्ड कार्यालय आणि पोलीस स्टेशन यांनी भरलेल्या बंदोबस्त उपस्थिती च्या आधारे दिले जात असून जिल्हा कार्यालयांनी सदर माहितीची नोंद अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

vi) कर्तव्य उपस्थिती सरासरी कमी असल्यामुळे प्रमाणपत्र करिता अपात्र सदस्यांनी पुढील कर्तव्ये नियमितपणे पुर्ण करुन आपली उपस्थिती सरासरी ६०% पेक्षा जास्त करावी .. आणि नंतरच प्रमाणपत्र करिता Request करावी.

vi) प्रमाणपत्र A4 size पेपरवर कलर प्रिंट घेवून लॅमिनेशन करुन घ्यावे .

v) प्रमाणपत्र प्रिंठ केल्यावर त्यावर होमगार्डची स्वाक्षरी असे लिहीले आहे त्या समोर चांगल्या पेन नी स्वाक्षरी करावी. व तदनंतरच प्रमाणपत्र लॅमिनेट करुन घ्यावे.

vi) प्रमाणपत्र बाबत अधिक माहिती, परीपत्रके ,नावातील दुरुस्ती, इत्यादी बाबता संबंधित जिल्हा होमगार्ड कार्यालमध्ये केंदनायक/ प्रशासिक अधिकारी यांचेशी संपर्क करावा. नावातील दुरुस्ती असल्यास जिल्हा कार्यालयाकडून दुरुस्ती करुन घ्यावी व नंतर पुन्हा प्रिट काढावी.

********* all the best **********